**ठळक बातम्या**

- 'नारी शक्ती सह विकसित भारत' या संकल्पनेवर आधारित यंदाचा महिला दिन साजरा करण्यात येणार
- प्रधानमंत्री आज उत्तराखंडच्या दौऱ्यावर/ बारमाही पर्यटनामुळे रोजगार वाढेल असं जाहीर सभेत केलं प्रतिपादन
- महाराष्ट्रात धान आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी सरकार सकारात्मक असून मंत्रिमंडळ बैठकीत याबाबत निर्णय घेऊ असं सरकारचं विधानसभेत आश्वासन
- सक्तवसुली संचालनालयाचे आज देशभरात ठिकठिकाणी छापे

**आणि**

- आयसीसी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी भारत आणि न्यूझीलंडचे संघ येत्या रविवारी दुबईत आमने सामने

**<><><><><>**

'नारी शक्ती सह विकसित भारत' या संकल्पनेवर आधारित यंदाचा महिला दिन साजरा करण्यात येणार असल्याची घोषणा केंद्रीय महिला आणि बालकल्याण मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी आज केली. या निमित्ताने नवी दिल्ली इथं विज्ञान भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत एका परिसंवादाचं आयोजनही करण्यात आल्याचं त्यांनी व्हिडीओ संदेशात म्हटलं आहे. महिलांनी आर्थिक, सामाजिक, राजकीय, राष्ट्रीय तसंच वांशिक,

भाषिक आणि सांस्कृतिक सीमा ओलांडून दाखवलेल्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी यंदा या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. सरकार विविध धोरणं आणि योजनांच्या माध्यमातून महिला सबलीकरण आणि लिंगभाव समानतेसाठी काम करत असल्याचंही त्या म्हणाल्या.

<><><><><>

उत्तराखंडमध्ये बारमाही पर्यटन सुरु राहावं, ऑफ सीझन कधीचं असू नये त्यामुळे  राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणात चालना मिळेल असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. उत्तराखंडच्या हर्सिल इथं ट्रेक आणि बाइक रॅलीला हिरवा झेंडा दाखवल्यानंतर जाहीर सभेला ते संबोधित करत होते. त्यापूर्वी त्यांनी उत्तरकाशी जिल्ह्यात मुखवा इथं गंगा मंदिरात पूजा केली. वर्षभर पर्यटनाचं सरकारचं उद्दिष्ट तरुणांना रोजगार देईल असं सांगताना हिवाळ्यात उत्तराखंडला भेट देण्याचं आवाहन त्यांनी केलं. केंद्रीय मंत्रिमंडळानं काल मंजूर केलेल्या सोनप्रयाग ते केदारनाथ आणि गोविंदघाट ते हेमकुंड साहिब या दोन रोपवे प्रकल्पांचा उल्लेख करताना ते म्हणाले की, यामुळे प्रवासाचा वेळ ३० मिनिटांपर्यंत कमी होणार आहे. सीमावर्ती भागाला पर्यटनाचा लाभ मिळण्यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. काही दिवसांपूर्वी माणा इथं घडलेल्या दुर्दैवी घटनेबद्दल प्रधानमंत्र्यांनी दु:ख व्यक्त केलं.

**बाईट -  होल्ड - प्रधानमंत्री...**

<><><><><>

महाराष्ट्रात धान आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी सरकार सकारात्मक असून मंत्रिमंडळ बैठकीत याबाबत निर्णय घेतला जाईल, असं कृषी राज्यमंत्री आशीष जयस्वाल यांनी विधानसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी याबाबत प्रश्न विचारला होता. नगरपालिका, नगरपंचायत क्षेत्रातल्या शेतकऱ्यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेचा लाभ देण्याची मागणी आमदार बाबासाहेब देशमुख यांनी केली. यावर तपासून कार्यवाही करण्याचं आश्वासन कृषी मंत्र्यांनी दिलं.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह भैय्याजी जोशी यांच्या वक्तव्याचा मुद्दा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी उपस्थित केला. भैयाजी जोशी यांनी मुंबईत मराठी येणं आवश्यक नसल्याचं वक्तव्याचा उल्लेख करत सरकारची याबाबत भूमिका काय आहे असा प्रश्न त्यांनी विचारला. यावर मुंबई आणि महाराष्ट्राची भाषा मराठीच असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं. यानंतर आदित्य ठाकरे याच विषयावर बोलायला उभे राहिले असता सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी आक्षेप घेतला. त्यामुळे सभागृहात काही वेळ गोंधळाचं वातावरण निर्माण झालं. आदित्य ठाकरे यांनी या विषयी विधानभवन परिसरात माध्यमांना सांगितलं…

मंत्री जयकुमार गोरे यांनी दैनिक सामनाचे कार्यकारी संपादक संजय राऊत, आमदार रोहित पवार आणि यूट्यूबर तुषार खरात यांच्यावर हक्कभंगाचा प्रस्ताव मांडला. या तिघांनी आपल्याविषयी अश्लील टिप्पणी केली असून

यामुळे आपली बदनामी झाल्याचं गोरे म्हणाले. हा प्रस्ताव हक्कभंग समितीकडे पाठवल्याचं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितलं.

**<><><><><>**

विधिमंडळाचं कामकाज सुरू होण्यापूर्वी विधिमंडळाच्या पायऱ्यांवर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी निदर्शने केली. मंत्री माणिकराव कोकाटे यांच्यासह धनंजय मुंडे यांची छायाचित्रे झळकावून विरोधकांनी त्यांच्याविरोधात घोषणाबाजी केली तसंच कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी केली. राज्यातल्या कायदा आणि सुव्यवस्था मोडकळीस आल्याचा आरोप करत सरकारचा निषेध केला.

**<><><><><>**

माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं आयोजित केलेल्या वेव्ज इंडिया २०२५ या कार्यक्रमांतर्गत मनोरंजन आणि माध्यम क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी वेव्ज बाजार हे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आलं आहे. या उपक्रमांतर्गत चित्रपट, टीव्ही, ॲनिमेशन, गेमिंग, जाहिरात, संगीत दिग्दर्शन, रेडिओ यांसह माध्यमांच्या विविध प्रकारांना थेट बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जाहिरात किंवा चित्रपटांचे निर्माते, गेम डेव्हलपर आदींसाठी या उपक्रमाच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य मिळू शकणार आहे.

**<><><><><>**

ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयानं आज देशभरात ठिकठिकाणी छापे टाकले. ठाणे, बेंगळुरू, चेन्नई, कोलकाता, तिरुवनंतपुरम, मलप्पुरम,

नंदयाल, पाकुर, लखनऊ आणि जयपूर या ठिकाणांचा यात समावेश आहे. पीएफआय अर्थात पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया या बंदी घातलेल्या राजकीय संघटनेच्या चौकशीचा एक भाग म्हणून ही छापेमारी करण्यात आली. सोशल डेमोक्रेटिक पार्टी ऑफ इंडिया आणि पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया या दोन्ही संघटनांनी संगनमतानं अनेक गुन्हेगारी कारस्थानं केल्याचा आरोप ईडीनं केला आहे. दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असल्याच्या आरोपावरून केंद्र सरकारनं २०२२ मध्ये पीएफआय या संघटनेवर बंदी घातली होती. सोशल डेमोक्रेटिक पार्टी ऑफ इंडिया या संघटननेवर पीएफआयची राजकीय संघटना असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांच्या युके दौऱ्याच्या वेळी फुटीरतावादी शक्तींनी सुरक्षाव्यवस्था भेदल्याचा भारतानं तीव्र निषेध केला आहे. हा लोकशाही हक्कांचा गैरवापर असून यजमान देशानं याबाबत काळजी घेतली पाहिजे असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. मुंबईत रॉयल ऑपेरा हाऊस इथं आयोजित मुरली देवरा स्मृती संवाद कार्यक्रमाला ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.

**<><><><><>**

काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी आज मुंबईच्या दौऱ्यावर आहेत. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राहुल गांधी यांचं मुंबई विमानतळावर पुष्पगुच्छ देऊन स्वागत केलं. यावेळी खासदार वर्षा गायकवाड,आमदार विजय वडेट्टीवार, आमदार सतेज पाटील यांच्यासह काँग्रेसचे नेते, पदाधिकारी उपस्थित होते.

**<><><><><>**

आयसीसीच्या चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत काल लाहोर इथं झालेल्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात न्यूझीलंडनं दक्षिण आफ्रिकेवर ५० धावांनी मात करत अंतिम फेरी गाठली. न्यूझीलंडनं दिलेल्या ३६३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेला निर्धारित ५० षटकांत ९ बाद ३१२ धावा करता आल्या. दुबईत झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात भारतानं ऑस्ट्रेलियाचा ४ गडी राखून पराभव करत स्पर्धेच्यी अंतिम फेरी गाठली. अंतिम फेरीचा सामना येत्या रविवारी भारत आणि न्यूझीलंड यांच्यात होणार आहे.

**<><><><><>**

इंडियन सुपर लीग फुटबॉल स्पर्धेत हैदराबाद एफसी आणि पंजाब एफसी यांच्यात आज संध्याकाळी साडे सात वाजता सामना होणार आहे. जेआरडी टाटा क्रीडा संकुलात काल झालेल्या सामन्यात ओडिशा एफसीनं जमशेदपूर एफसीचा ३-२ असा पराभव केला. ओडिशाकडून ह्युगो बोउमोसने दोन गोल

केले तर डोरीने एक गोल केला. जमशेदपूरकडून जॉर्डन मरे आणि स्टीफन एझेने प्रत्येकी एक एक गोल केला.

//<><><><><>//